जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०९/०७/२०२३
## दि.०८/०७/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे २८८/२०२३,भादविक ३०७,५०४,५०७,३४,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | अंजिक्य जायभाये,वय २४ वर्ष,रा.लेन नं.१,कर्वेनगर,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम त्याचा एक साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०८/०७/२०२३ रोजी दुपारी १४/३० वा.केटीएम शो-रुम जवळ,वारजे,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचा मित्र कृष्णा देऊलकर याचेसह राहते घरी असताना,कृष्णाची नातेवाईक महिला हिने तीची रुम मेट महिला हिस घरभाडे मागितले होते. त्यावेळी सदर रुममेट महिला हिचा मित्र यातील नमुद इसमाने कृष्णाची नातेवाईक महिला हिस फोनव्दारे शिवीगाळ केली होती. त्याचा जाब सदर इसमास जाब विचारल्याचा राग मनात धरून कृष्णाला चाकु मारण्यासाठी धावुन आला,त्यावेळी फिर्यादी हे त्यास पकडत असताना,त्याने फिर्यादी यांचे डाव्या बाजुचे छातीखाली जोराने चाकु मारून,त्यांना गंभीर जखमी केले. त्यावेळी फिर्यादी हे कृष्णाला बाजुला घेवुन जात असताना,कृष्णा यास चाकुने उजव्या हातास व पाठीस मारून,दोघांना गंभीर जखमी करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. पाटील ९०२८७८४३४३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे १३८/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-३५ वर्षे,रा.पाटील इस्टेट,वाकडेवाडी,शिवाजीनगर,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०८/०७/२०२३ रोजी ०१/०० वा.निर्मला ॲटोमोबाईल्स,शिवाजी पुतळा चौक,शिवाजीनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे स्वारगेटवरून शिवाजीनगरकडे पायी जात असताना,त्यांना थकवा आल्याने नमुद ठिकाणी बसले असता,नमुद इसमांनी त्यांचे जवळ येवुन,हातातील लोखंडी कटर सारखे हत्याराचा धाक दाखवुन,फिर्यादी यांचेकडील ५,०००/- रु किचा मोबाईल व ३,५००/- रूपये रोख रक्कम असा एकुण ८,५००/- रू किमतीचा ऐवज जबरी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अर्जुन नाईकवाडे ९१५८२२१४२८ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे १५०/२०२३,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | अथर्व मोघे,वय-२० वर्षे,रा.सिंहगड रोड,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०७.०७.२०२३ रोजी १६/०० वा.पासुन ते दिनांक ०८.०७.२०२३ रोजीचे ०८/०० वा.चे दरम्यान मुळा नदीवरील शनिवार पेठ,दशक्रिया विधी घाटावरील महानगर पालिकेचे बिल्डींग मधील कपाटातुन |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा पौराहित्यचा व्यवसाय असुन,त्यांचे मुळा नदीवरील शनिवार पेठ,दशक्रिया घाटावरील महानगर पालिका,पुणे यांचे दशक्रिया घाट येथील बिल्डींगचे शटर कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने, सदर बिल्डींगचे शटर उचकटुन, त्यावाटे आंत प्रवेश करून, आत मधील कपाटाचे कुलुप तोडुन,फिर्यादी यांचे व्यवसायाचे दशक्रिया विधीस लागणारी तांब्या धातुची १)१० मोठी तामने २)१९ पळया ३)१० छोटी तामने ४)०२ तांबे असा एकुण ६,६००/- रुपये किची भांडी घरफोडी चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. भोसले ९४२२५३३२९३ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**